## प्रेस नोट दि.१७/०७/२०१९
## पोलीस स्टेशन :- स्वारगेट पोलीस स्टेशन, पुणे शहर
## दहशत निर्माण करण्यासाठी पिस्तोल बाळगण्या-या सराईत गुंडास अटक

दि.१७/०७/२०१९ रोजी स्वारगेट पोलीस स्टेशन कडील **वरिष्ठ पोलीस निरीक्षक** श्री.अशोक कदम यांचे दिमतीत तपास पथकातील पोलीस उप-निरीक्षक श्री.कदम व पो.हवा.२६९० शेख, पो.हवा.१७३२ गभाले, पो.ना.७६१० कुंभार, पो.शि.१२००३ भोकरे, पो.शि.८२३९कांबळे, पो.शि.१०२०८ सरक असे गुन्हे प्रतिबंधक पेट्रोलिंग करीत असताना **पो.शि.बडे व पो.शि.भोकरे यांना त्यांचे बातमीदाराकडुन बातमी मिळाली की, पुणे शहरातील एक सराईत गुंड गावठी कट्टा घेऊन स्वारगेट एस.टी.स्टँन्ड येथे कोणाची तरी वाट पाहत थांबला आहे**. अशी बातमी मिळाल्याने सदर इसमास पकडणेबाबत पोलीस निरीक्षक(गुन्हे) श्री सय्यद, स्वारगेट पोलीस ठाणे पुणे यांनी सुचना दिल्या त्यांचे सुचनेप्रमाणे वरील स्टाफने स्वारगेट एस.टी स्थानकात सापळा रचुन इसम नामे किशोर रामभाऊ चौथे वय-२२वर्षे, रा.अप्पर शेळके वस्ती, गणपती मंदीरामागे, गल्ली नं.१२, पुणे यास पाठलाग करुन शिताफीने ताब्यात घेतले. **त्याचे ताब्यातुन किं. रु - २६,०००/- चे एक गावठी बनावटीचा कट्टा व एक जिवंत काडतुसासह ताब्यात घेतले**. सदर आरोपीकडे अधिक तपास करता **त्याने दहशत निर्माण करण्यासाठी पिस्तोल बाळगल्याचे सांगीतले आहे.** त्याचेवर पुणे शहरात बिबवेवाडी, कोंढवा पोलीस ठाणेत जबरीचोरी, दरोडा, दरोड्याची तयारी असे गुन्हे दाखल आहेत. **त्याचे विरुध्द स्वारगेट पोलीस स्टेशन पुणे गु.र.नं– ३४०/२०१९ भारताचा हत्याराबाबत चा कायदाकलम ३ (२५) सह महाराष्ट्र पोलीस ॲक्ट कलम ३७ (१) सह १३५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.**

सदर कामगिरी अप्पर पोलीस आयुक्त पश्चिम प्रादेशिक विभाग, श्री.श्रीकांत तरवडे, परिमंडळ २ पुणेचे पोलीस उपायुक्त श्री बच्चन सिंह, स्वारगेट विभाग पुणेचे सहाय्यक पोलीस आयुक्त श्रीमती प्रिती टिपरे, स्वारगेट पोलीस स्टेशन पुणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.अशोक कदम, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री शब्बीर सय्यद यांचे मार्गदर्शना खाली तपास पथकाचे पोलीस उप निरीक्षक समाधान कदम, पो.हवा.२६९० शेख, पो.हवा.१७३२ गभाले, पो.ना.७६१० कुंभार, पो.शि.९८६७ बडे, पो.शि.१२००३ भोकरे, पो.शि.८२३९ कांबळे, पो.शि.१०२०८ सरक यांनी केलेली आहे.

